• वर्ष : ०३ • अंक : २८६ • पुणे • बुधवार, दि. ०८ जुलै २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक





रिंगरोडच्या कामादरम्यान चिखलात उतरलेल्या वीजप्रवाहाचा फटका 3



सह्याद्रीच्या कुशीत लपलेला निसर्गाचा ठेवा 4

## ठळक बातम्या

### पाण्याची पातळी कमी होण्यास सुरुवात

पुणे (आरंभ पर्व) : पुण्यात काल रात्रीपासून मुसळधार पाऊस सुरु असल्याने खडकवासला धरणाच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ होत आहे. आता खडकवासला धरणातील पाण्याची पातळी झपाट्याने कमी होत असल्यामुळे दुपारी 12:30 वाजल्यापासून धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदीपात्रात सोडण्यात येणाऱ्या पाण्याचा विसर्ग 27,203 क्युसेक वरून 18,271 क्युसेक इतका कमी करण्यात आला आल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. काल रात्री 12 ते 1 वाजेदरम्यान 842 क्युसेक पाणी सोडण्यात आले. त्यानंतर 1 ते 1.30 वाजेदरम्यान विसर्ग 1,684 क्युसेकपर्यंत वाढविण्यात आला. पुढील काही तासांत हा विसर्ग वेगाने वाढत गेला. रात्री 1.30 ते 2.30 या वेळेत 3,424 क्युसेक, रात्री 2.30 ते 3.15 दरम्यान 6,634 क्युसेक, तर 3.15 ते 3.45 या कालावधीत 14,393 क्युसेक पाणी नदीपात्रात सोडण्यात आले.

### आळंदीत पूर ओसरला

आळंदी (आरंभ पर्व) : इंद्रायणी नदीच्या पाणलोट क्षेत्रात सलग तीन दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे आळंदीत निर्माण झालेली पूरस्थिती मंगळवारी दुपारनंतर काहीशी निवळू लागली. नदीची पाणीपातळी कमी झाल्याने नगरपालिका चौकाजवळील नवीन पूल पाण्याबाहेर आला असून, गुरुवारी माऊलींची पालखी पुण्याकडे रवाना करण्यासाठी या पुलाचा वापर करता येईल का, याबाबत प्रशासनाची तयारी वेगाने सुरू आहे. पूराच्या धोक्यामुळे आळंदी देवस्थान परिसराशी जोडणारे चारही प्रमुख पूल मागील दोन दिवसांपासून वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आले आहेत. पालखी प्रस्थानाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी मंगळवारी रात्री नवीन पुलाचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट केले.

# येरवडा खुल्या कारागृहात अवतरली 'पंढरी'

## आषाढी वारी कीर्तन महोत्सवात गांधीजींच्या तुकोबांच्या अभंगांच्या भाषांतराला उजाळा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आषाढी एकादशीचे औचित्य साधत येरवडा खुल्या कारागृहात सोमवारी भक्तिरसाने ओथंबलेला "आषाढी वारी विशेष कीर्तन महोत्सव" उत्साहात पार पडला. कारागृहाच्या प्रांगणात टाळ-मृदंगाच्या गजरात विठ्ठल नामाचा अखंड जयघोष घुमला आणि संपूर्ण परिसर विठ्ठलमय झाला. या सोहळ्यात महात्मा गांधी यांनी येरवडा कारागृहात असताना संत तुकाराम महाराजांच्या १४ अभंगांचे केलेले इंग्रजी भाषांतर या ऐतिहासिक घटनेचीही भावपूर्ण आठवण करून देण्यात आली.

महाराष्ट्र कारागृह विभागाच्या "सुधारणा आणि पुनर्वसन" धोरणांतर्गत अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक (कारागृह व सुधारसेवा) डॉ. सुहास वारके, विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई आणि कारागृह उपमहानिरीक्षक (पश्चिम विभाग) सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

आळंदी येथील जगतसद्गुरू श्री तुकाराम महाराज वारकरी संस्थाचे अध्यक्ष व प्रख्यात कीर्तनकार ह.भ.प. लहू महाराज जाधव यांनी आषाढी एकादशीचे महत्त्व, संत तुकाराम महाराजांचे अभंग आणि विठ्ठलभक्तीचा संदेश प्रभावी शैलीत मांडला. त्यांच्या कीर्तनाने कारागृहातील वातावरण भक्तिमय झाले. या सोहळ्यास तबलावादक पांडुरंग विठ्ठल पवार, हार्मोनियमवादक अभय नलगे, गायनाचार्य सदानंद महाराज कडुळे, मृदंग व तबलासाथ चैतन्य पांडुरंग पवार, सूर्यांश समाधान शर्मा आणि बाल कीर्तनकार हर्षवर्धन लहू जाधव यांनी सुरेल साथ दिली.

कार्यक्रमात संतसाहित्याचे अभ्यासक व लेखक विजय बोत्रे पाटील यांनी येरवडा कारागृहाच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण प्रसंग उलगडला. महात्मा गांधी यांना येरवडा कारागृहात ठेवण्यात आले असताना त्यांनी संत तुकाराम महाराजांच्या १४ निवडक अभंगांचे इंग्रजीत भाषांतर केले होते, याची त्यांनी उपस्थितांना आठवण करून दिली.

येरवडा कारागृह ही केवळ शिक्षेची जागा नसून वैचारिक परिवर्तन आणि आत्मचिंतनाची भूमी आहे, हे गांधीजींच्या या कार्यातून अधोरेखित होते, असे त्यांनी सांगितले. येरवडा खुल्या कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे यांनी बंदीवानांना मार्गदर्शन करताना संत तुकाराम महाराजांचा प्रसिद्ध अभंग उद्धृत केला.

**"पापाची वासना नको दावू डोळां...**
**निंदेचे श्रवण नको माझे कानी...**
**अपवित्र वाणी नको माझ्या मुखा..."**

या अभंगातील विचारांचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, कारागृहातील काळ हा आत्मपरीक्षण, आत्मशुद्धी आणि नव्या जीवनाची दिशा स्वीकारण्याचा असतो. संतांनी दाखविलेल्या सत्कर्माच्या मार्गावर चालण्याचा निर्धार प्रत्येक बंदीवानाने करावा, असे आवाहन त्यांनी केले. त्यांच्या मनोगताने अनेक बंदीवान भावूक झाल्याचे दिसून आले.

**पसायदानाने झाली सांगता**

कार्यक्रमाची सुरुवात विठ्ठल-रुक्मिणी तसेच संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर सर्व उपस्थितांनी सामूहिकरित्या 'पसायदान' म्हणत विश्वकल्याणाची प्रार्थना केली. "राम कृष्ण हरी"च्या गजरात आणि विठ्ठल नामाच्या अखंड घोषात या ऐतिहासिक कीर्तन महोत्सवाची सांगता झाली.

### सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे योगदान

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वरिष्ठ तुरुंग अधिकारी नागेश कांबळे, तुरुंग अधिकारी नागनाथ भानवसे, निशा श्रेयकर, कार्यालयीन अधीक्षक नीता उके, वरिष्ठ लिपिक गोविंद गावडे, लिपिक प्रवीण खुस्पे, सुभेदार सुनील गायकवाड, बालाजी सांवत, चंद्रकांत खांदवे, हवालदार राजेंद्र धनगर, दत्तात्रय मोडक, महिला कारागृह शिपाई सरला साबळे, मीना पोटकुळे, संध्या जाधव, ऐश्वर्या मुळे, संतोषी हिंगे, तसेच कारागृह शिपाई राकेश पवार, याकुब शेख, विजयकुमार दिवेकर, निलेश मांढरे, महेंद्र लोहकरे यांच्यासह सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या भक्तिमय सोहळ्यास कारागृहातील सर्व शिक्षाबंदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संतविचार, कीर्तन आणि नामस्मरणाच्या माध्यमातून सुधारणा, आत्मपरिवर्तन आणि समाजात सकारात्मक पुनर्स्थापना हा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांच्या मनात कायमचा ठसा उमटवून गेला.

## गणेशखिंडीत संशयास्पद कचरा!

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

जुन्नर-माळशेज घाट परिसरातील निसर्गरम्य गणेशखिंडीत अज्ञात लोकांनी संशयास्पद कचरा आणि घाण टाकल्याचा प्रकार समोर आला आहे.यामुळे पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. हा परिसर अत्यंत निसर्गरम्य असून, येथील सौंदर्य पाहण्यासाठी आणि खिंडीतील श्री गणेशाचे दर्शन घेण्यासाठी पर्यटक व भाविक आवर्जून येथे थांबतात. अशा पवित्र आणि सुंदर ठिकाणी हा कचरा टाकण्यात आल्याने परिसराचे विद्रुपीकरण झाले आहे. या कचऱ्याबाबत एक शक्यता वर्तवली जात आहे. सध्या अन्न व औषध प्रशासनाचे (FDA) वरिष्ठ अधिकारी तुकाराम मुंडे यांच्या धडक कारवाईचा धसका अनेकांनी घेतला आहे. त्यामुळेच त्यांच्या कारवाईच्या भीतीने तर हा संशयास्पद कचरा किंवा मुदत संपलेले साहित्य रात्रीच्या अंधारात इथे आणून टाकले नाही ना? अशी शंका उपस्थित केली जात आहे. यामागे अन्य काही कारणे देखील असू शकतात.



- **तुकाराम मुंडेंच्या भीतीने एक्सपायरी मेडिकल साहित्य टाकल्याची शक्यता?**

"सुंदर अशा गणेशखिंडीमध्ये काहीतरी संशयास्पद कचरा प्रकारातील घाण टाकल्याचे दिसून येत आहे. याकडे वन विभागाचे लक्ष आहे का? हे नेमके काय आहे आणि कोणी टाकले, याची तत्काळ चौकशी आणि तपास व्हायला हवा," अशी मागणी 'वसुंधरा मित्र' आणि 'इको फ्रेंडली क्लब'चे संस्थापक परशुराम कोकणे यांनी केली आहे. पर्यटन आणि वन क्षेत्राचे नुकसान करणाऱ्या या घटकांचा शोध घेऊन वन विभाग आणि संबंधित प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

## आळंदीत माऊलींच्या पालखी प्रस्थान सोहळ्याला सुरुवात

**आळंदी (दै. आरंभ पर्व)**

**अवघाचा संसार सुखाचा करीन**
**आनंदे भरीन तिन्ही लोक !!**
**जाईन गे माये तया पंढरपुरा !**
**भेटेन माहेर आपुलिया !!**

श्री. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या १९५ व्या आषाढी पायीवारी प्रस्थान सोहळ्याला सुरुवात झाली आहे. तत्पूर्वी पहाटे चारला घंटानादाने सुरुवात झाली. भक्तीच्या या वैभवी सोहळ्यात हजारो वैष्णवांनी माउलींच्या समाधीचे दर्शन घेतले. 'ज्ञानोबा - माऊली - तुकारामांचा' देहभान विसरून जयघोष करीत पंढरीकडे जाण्यासाठी अनेक वारकरी ज्ञानियांच्या अलंकापुरीत दाखल झाले आहेत. तर महापुराच्या पार्श्वभूमीवर अनेक वारकरी पुण्याकडे मार्गस्थ झाले आहेत. प्रस्थान सोहळ्यास बुधवारी (दि.८) पहाटे चारला घंटानादाने सुरुवात झाल्यानंतर 'श्रीं'ना पवमान अभिषेक, पंचामृत पूजा व दुधआरती करण्यात आली. त्यानंतर नित्यनियमाप्रमाणे भाविकांच्या पूजा व दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले होते. दुपारी बाराला 'श्रीं'ना महानैवेद्य वाढविण्यात आला. त्यानंतर भाविकांचे दर्शन बंद करून मंदिर परिसर पाण्याने स्वच्छ करण्यात आला. दुपारी अडीचच्या सुमारास मानाच्या ४७ दिंड्यांतील प्रत्येकी पन्नास वारकऱ्यांना मुख्य महाद्वारातून मंदिरात घेण्यास सुरुवात करून प्रस्थान सोहळ्याच्या मुख्य कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली आहे. साडेतीनच्या सुमारास माउलींच्या दोन्ही अश्वांना मंदिरात प्रवेश दिला जाईल. संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान व हैबतबाबा यांच्यातर्फे 'श्रीं'ची आरती केल्यानंतर विना मंडपात मानकऱ्यांना मान देऊन सजवलेल्या पालखीत माउलींच्या पादुकांना विराजमान करण्यात येतील. तद्नंतर ग्रामस्थ व मानकऱ्यांच्या खांद्यावरून संजीवन समाधी मंदिर प्रदक्षिणा झाल्यानंतर सायंकाळी सहाच्या सुमारास पालखी महाद्वारातून प्रस्थान ठेवणार आहे.

सद्यस्थितीत, टाळ - मृदुगाच्या निनादात 'ज्ञानोबा - तुकारामांचा' जयघोष करत फेर, फुगड्यानी मंदिर परिसर अगदी दुमदुमून सोडला आहे. वारकऱ्यांच्या उत्साहाला आंनदाची भरती आली आहे. भगवी पताका खांद्यावर घेतलेले पुरुष वारकरी, तुळशी वृंदावन डोईवर घेऊन विठूनामाच्या गजरात तल्लीन झालेली महिला वारकरी आणि यामध्ये सहभागी झालेले तरुण वारकऱ्यांनी प्रस्थान सोहळ्यात लक्ष वेधून घेत आहेत. सुमारे तीन तासांहून अधिक वेळ वैभवी प्रस्थान सोहळा चालणार आहे. रात्री उशिरा माऊलींचा सोहळा दर्शन मंडप इमारतीत पहिल्या मुक्कामासाठी विसावला जाईल.



- घंटानादाने पालखी प्रस्थान सोहळ्यास प्रारंभ.
- धार्मिक वातावरणात व चैतन्यमय भक्तिरसात अलंकापुरी चिंब.
- प्रस्थान सोहळ्यासाठी मर्यादित वारकऱ्यांची उपस्थिती.
- पोलिसांचा कडेकोट चोख बंदोबस्त.
- देऊळ वाड्यात फेर, फुगड्या...
- अलंकापुरी पावसात चिंब

## अनुदानित अध्यापक विद्यालयातील २५ लाखांच्या कथित अतिरिक्त

# फी घोटाळ्याप्रकरणी महिनाभरानंतरही कारवाई नाही

### उच्च न्यायालयात याचिकेचा इशारा

- २०१८-१९ पासून शासनाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा दुप्पट शुल्क आकारल्याचा आरोप
- चौकशी न झाल्यास न्यायालयाचे दार ठोठावणार

**धाराशिव (दै. आरंभ पर्व)**

धाराशिव येथील श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित अनुदानित अध्यापक विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून विद्यार्थ्यांकडून शासनाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा अतिरिक्त शुल्क आकारून सुमारे २५ लाख रुपयांचा कथित आर्थिक घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात संबंधित विभागाकडे लेखी निवेदन देऊन जवळपास महिना उलटूनही कोणतीही चौकशी किंवा कारवाई सुरू न झाल्याने तक्रारदारांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, लवकरात लवकर चौकशी सुरू न झाल्यास उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा दिला आहे.

तक्रारीनुसार, हे अध्यापक विद्यालय शासन अनुदानित असूनही विद्यार्थ्यांकडून शासनाने निश्चित केलेल्या वार्षिक शिक्षण शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारण्यात आली. शासन निर्णयानुसार वार्षिक शिक्षण शुल्क ३,३०० रुपये असताना विद्यार्थ्यांकडून ६,५०० रुपये वसूल करण्यात आल्याचा आरोप आहे. म्हणजेच प्रत्येक विद्यार्थ्याकडून ३,२०० रुपये अतिरिक्त घेतले गेल्याचे नमूद करण्यात आले आहे.





तक्रारीत म्हटले आहे की, प्रथम व द्वितीय वर्षातील सुमारे १०० विद्यार्थ्यांकडून दरवर्षी अतिरिक्त शुल्क आकारण्यात आले. गेल्या आठ वर्षांत याच पद्धतीने सुमारे २५ लाख रुपयांची अतिरिक्त वसुली करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. विशेष म्हणजे ही रक्कम रोख स्वरूपात स्वीकारण्यात आली असून विद्यार्थ्यांना कोणतीही अधिकृत पावती देण्यात आली नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

चर्चा तर होणारच
अभिषेक मरगळे

तक्रारदारांच्या मते, हे विद्यालय शासन अनुदानित असल्यामुळे शासनाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारणे नियमबाह्य आहे. तसेच अतिरिक्त रक्कम अधिकृत लेखापद्धतीत न दाखवता रोखीने स्वीकारल्याने आर्थिक व्यवहारांबाबतही गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. यामुळे शासनाची दिशाभूल झाली असून विद्यार्थ्यांची आर्थिक फसवणूक झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणात संबंधित संस्था चालक व प्रभारी प्राचार्य यांच्याविरुद्ध फसवणूक व संगनमतासंदर्भातील कायदेशीर तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच संपूर्ण प्रकरणाची चौकशी राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (सीआयडी) किंवा आर्थिक गुन्हे शाखेमार्फत करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. तक्रार दाखल करून जवळपास महिना उलटूनही संबंधित विभागाकडून कोणतीही प्राथमिक चौकशी किंवा अधिकृत भूमिका समोर आलेली नसल्याने विद्यार्थी, पालक आणि तक्रारदारांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे. अनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये अशा प्रकारे अतिरिक्त शुल्क आकारले जात असेल तर त्याचा फटका थेट विद्यार्थ्यांना बसत असून शासनाच्या शुल्क नियमन व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे.

दरम्यान, या प्रकरणातील आरोपांची संबंधित संस्था किंवा प्रशासनाकडून अधिकृत पुष्टी अथवा प्रतिक्रिया अद्याप समोर आलेली नाही. तक्रारीवर नियमानुसार चौकशी होऊन सत्यस्थिती स्पष्ट होणे आवश्यक असल्याची मागणीही पुढे येत आहे. तक्रारदारांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, लवकरात लवकर चौकशी सुरू न झाल्यास उच्च न्यायालयात याचिका दाखल करून न्यायालयीन हस्तक्षेपाची मागणी करण्यात येईल.

### तक्रारदारांनी केलेल्या मागण्या

- संबंधित अनुदानित अध्यापक विद्यालयाची मान्यता व अनुदान तात्काळ स्थगित करण्यात यावे.
- संस्था चालक व प्रभारी प्राचार्य यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा.
- २०१८-१९ पासून विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त वसूल करण्यात आलेली सुमारे २५ लाख रुपयांची रक्कम व्याजासह परत करण्याचे आदेश द्यावेत.
- संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी.

## थोडक्यात पण महत्वाचे




### शालेय विद्यार्थ्यांसाठी समूहगीत गायन स्पर्धेचे आयोजन

पुणे (आरंभ पर्व) : 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीताच्या १५० व्या वर्षपूर्तीनिमित्त तसेच ९ ऑगस्ट 'क्रांती दिना'चे औचित्य साधून नागरिक सोशल फाउंडेशनच्या मूल्य शिक्षण विभागातर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी 'संपूर्ण वंदे मातरम् समूहगीत गायन स्पर्धे'चे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रभक्तीची भावना विद्यार्थ्यांमध्ये अधिक दृढ व्हावी आणि नवीन पिढीला संपूर्ण 'वंदे मातरम्' गीत पाठ व्हावे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे, अशी माहिती नागरिक सोशल फाउंडेशनच्या शीतल गोडबोले यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी संस्थेचे विश्वस्त अमेय सप्रे उपस्थित होते. ही स्पर्धा रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत डी. ई. एस. इंग्लिश मीडियम स्कूल येथे होणार आहे. स्पर्धा इयत्ता पहिली ते चौथी आणि पाचवी ते सातवी अशा दोन गटांत आयोजित करण्यात आली असून प्रत्येक संघात १० विद्यार्थी गायक असणे आवश्यक आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ५ ते १० विद्यार्थ्यांचा स्वतंत्र गट ठेवण्यात आला असून त्यांचे परीक्षण स्वतंत्र निकषांनुसार करण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी नावनोंदणीची अंतिम मुदत ३० जुलै २०२६ असून इच्छुक शाळांनी नागरिक सोशल फाउंडेशनच्या www.nagariksocialfoundation.org या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. प्रत्येक गटात प्रथम, द्वितीय, तृतीय तसेच तीन उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येणार आहेत. याशिवाय सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार असून स्पर्धेनंतर लगेचच पारितोषिक वितरण समारंभही आयोजित करण्यात येणार आहे. शाळांनी मोठ्या संख्येने या राष्ट्रभक्तीपर उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन नागरिक सोशल फाउंडेशनच्या मूल्य शिक्षण विभागाने केले आहे. स्पर्धेसाठी अत्यंत नाममात्र प्रवेश शुल्क आकारण्यात येणार असून अधिक माहितीसाठी ९४२२०००४६९ किंवा ७७९८९८२०२१ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

### सर भांडारकर यांची जयंती साजरी



पुणे (आरंभ पर्व) : थोर संशोधक आणि समाजसुधारक सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांची १८९ वी जयंती भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिरामध्ये आज साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष ॲड. सदानंद फडके, उपाध्यक्ष प्रा. सदानंद मोरे, मानद सचिव प्रा. सुधीर वैशंपायन, कोशाध्यक्ष संजय पवार, नियामक परिषदेचे अध्यक्ष अभय फिरोदिया, कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष भूपाल पटवर्धन तसेच संस्थेचे विश्वस्त प्रदीप रावत, भरत फाटक, अन्य पदाधिकारी आणि कर्मचारी या प्रसंगी उपस्थित होते. संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा येत्या दोन महिन्यांत घेण्यात येईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली. सर भांडारकर यांचा ६ जुलै १८३७ रोजी मालवण येथे जन्म झाला होता. प्राच्यविद्येच्या क्षेत्रातील सर्व विषयांमध्ये त्यांनी मूलगामी स्वरूपाचे संशोधन आणि लेखन केले होते. एल्फिन्स्टन कॉलेज, मुंबई, डेक्कन कॉलेज, पुणे येथे त्यांनी अध्यापन केले तसेच हजारो हस्तलिखितांचे संकलन केले. १८९३-९४ साली त्यांनी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरुपद देखील भूषवले होते. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून भांडारकर संस्थेची स्थापना १९१७ साली करण्यात आली. २४ ऑगस्ट १९२५ (ऋषीपंचमी) रोजी त्यांचे पुण्यात निधन झाले. सर भांडारकरांच्या कार्याचे स्मरण आज त्यांच्या जयंतीदिनी भांडारकर संस्थेच्या वतीने करण्यात आले.

### पुणेकर दिग्दर्शक आणि निर्मात्यांचे बॉलीवूडमध्ये यश



पुणे (आरंभ पर्व) : चित्रपटसृष्टीमध्ये नावलौकिक मिळवण्याचे अनेकांचे स्वप्न असते, परंतु या क्षेत्रामध्ये संधी मिळणेही अनेकदा आव्हानात्मक ठरते . अशा या बॉलीवूड जगतामध्ये पुणेकर असलेल्या दिग्दर्शक आणि निर्मात्यांनी केवळ संधीच मिळविली नाही तर बॉलीवूडमध्ये " बेबी डू डाय डू" या चित्रपटाच्या निमित्ताने घवघवीत यशही मिळवले. हा चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीला उतरला असून पुण्यातील बहुतांश चित्रपटगृहांमध्ये चित्रपटाच्या तिकीट खिडकीवर हाउसफुल बोर्ड झळकले आहेत. सलीम सिबलिंग आणि पुणे 04 पिक्चर एलाएलपी यांनी निर्मिती केलेला हुमा कुरेशी यांची प्रमुख भूमिका असलेला 'बेबी डू डाय डू' हा हिंदी चित्रपट 3 जुलै रोजी प्रदर्शित झाला. चित्रपटाचे निर्माते आणि दिग्दर्शक नचिकेत सामंत हे पुणेकर आहेत. सामंत यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या 'बेबी डू डाय डू' या चित्रपटाला पुण्यासह देशाच्या अनेक चित्रपटगृहांमध्ये प्रेक्षकांनी हाउसफुल गर्दी केली आहे.

### खून करणाऱ्याला जन्मठेप; जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचा निकाल

राजगुरूनगर(आरंभ पर्व) : चार वर्षांच्या लहान बालकाचा निर्घुण खून करणाऱ्या आरोपीला येथील राजगुरुनगर जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने जन्मठेप आणि २५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश ए. एस. सय्यद यांनी हा निकाल दिला. सचिन दत्तात्रय पिंगळे (वय ४६, रा. आंबेडकरनगर, चाकण) असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पिंगळे याने घराशेजारी राहणाऱ्या लहान बालकाला खेळण्यासाठी घरी नेऊन त्याचा खून केला होता. ही घटना ५ एप्रिल २०१६ रोजी झाली होती. घटनेच्या दिवशी संजोग उर्फ बंकू संजय भोंडवे या बालकाला खेळण्यासाठी आरोपी व त्याच्या अल्पवयीन मुलीने दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास आपल्या घरी नेले होते. संजोगची आई त्याला पाठविण्यास तयार नसतानाही त्याला बळजबरीने घेऊन गेल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. संध्याकाळपर्यंत संजोग घरी न परतल्याने त्याच्या आई, वडील व भावाने शोधाशोध सुरू केली. आरोपीच्या घरी जाऊन विचारणा केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, शेजाऱ्यांनी संजोग दुपारीच आरोपीच्या घरात गेल्याचे आणि बाहेर न आल्याचे सांगितले. त्यानंतर नातेवाईक व परिसरातील नागरिक आरोपीच्या घरात शोध घेण्यासाठी गेले. सुरुवातीला आरोपी व त्याच्या मुलीने घरात शोध घेण्यास विरोध केला होता. शोधादरम्यान घरातील असलेल्या भूमिगत पाण्याच्या टाकीकडे संशय गेला. टाकीचे झाकण उघडण्यास आरोपीने विरोध केला. मात्र, उपस्थितांनी झाकण उघडून पाहिले असता टाकीतील पाण्यात संजोगचा मृतदेह आढळून आला. त्याला तात्काळ खासगी रुग्णालयात नेण्यात आले; मात्र, डॉक्टरांनी उपचारापुर्वीच मृत घोषित केले होते. शवविच्छेदन अहवालात संजोगचा मृत्यू नाक व तोंड दाबल्याने झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर चाकण पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. सहायक पोलिस निरीक्षक महेश ढवाण यांनी त्यावेळी तपास करून आरोपीला अटक केली होती.

# उपमहापौर परशुराम वाडेकर धावले नागरिकांच्या मदतीला

## नदी सुधार प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष कारणीभूत असल्याचा उपमहापौरांचा गंभीर आरोप



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गेल्या दोन दिवसांपासून पुणे शहरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे बोपोडी परिसरातील मुळा नदीच्या पाण्याच्या पातळीत झपाट्याने वाढ झाली. परिणामी प्रभाग क्र. ०८ मधील नदीकाठच्या अनेक वस्त्यांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने नागरिकांची मोठी गैरसोय झाली असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. पूरग्रस्त नागरिकांच्या मदतीसाठी उपमहापौर परशुराम वाडेकर हे गुडघाभर पाण्यात उतरले होते. नदीपात्रात उद्भवलेल्या या या सर्व प्रकाराला नदी सुधार प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष कारणीभूत असल्याचा गंभीर आरोप उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी केला आहे. या विषयी बोलताना उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी सांगितले की, मागील दोन दिवस सुरू असलेल्या पावसामुळे निम्मी बोपोडी पाण्याखाली गेली आहे. पुराचा फटका आदर्श नगर, कोटकर लेन, मंत्री रिवेरा, गोयल-शिंदे पार्क, बोपोडी स्मशानभूमी, मुस्लिम कब्रस्तान परिसर, चिखलवाडी आणि पडाळ वसाहत या भागांना बसला. अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्याची वेळ आली. महापालिका प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत असून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. पुढे बोलताना वाडेकर यांनी सांगितले की, नदीवर झालेल्या नवीन पूलांचे काम सुरू असताना निर्माण केलेल्या पर्यायी पूलांचे सांगडे नदीत तसेच आहेत, यामुळे पाणी वाहण्यास अडथळा निर्माण होत असल्याचे नदी सुधार प्रकल्पाचे अधिकारी गोजारे यांच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. या बाबत सभागृहात प्रश्न उपस्थित केलेले आहेत तरीही अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे. परिणामी नदीला पुर आलेला नसतानाही बोपोडी पाण्याखाली गेली आहे.

परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत परशुराम वाडेकर यांच्यासह माजी उपमहापौर सुनीता वाडेका, आनंद छाजेड, नगरसेविका सपना छाजेड, अविनाश कदम, आप्पासाहेब वाडेकर, अविनाश सपकाळ (उपायुक्त, परिमंडळ क्र. ०२, पुणे महानगरपालिका) तसेच विजय नायकल (सहाय्यक आयुक्त, औंध-बोपोडी क्षेत्रीय कार्यालय) यांनी बाधित भागांची प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांशी संवाद साधला. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने मदतकार्य, पाणी उपसा, स्वच्छता, आरोग्यविषयक उपाययोजना तसेच आवश्यक ती सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत प्रशासन परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. दरम्यान, बोपोडी परिसरात उद्भवलेल्या परिस्थितीची जाणीव आयुक्त नवल किशोर राम यांना करून देण्यात आली आहे. आयुक्तांनी हा प्रश्न गांभीर्याने घेतला असून उद्या दुपारी यासाठी बैठक बोलावण्यात आल्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी सांगितले.

## एकाच परिवारातील तिघांच्या यशाचे होतेय कौतुक



**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने २०२५-२६ मध्ये घेतलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत मढ ता.जुन्नर ह्या एकाच गावातील व एकाच परिवारातील तीन विद्यार्थ्यांनी पुणे जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान पटकाविले. जुन्नर येथील शंकरराव बुट्टे पाटील विद्यालयात सेमी मराठी माध्यमातून शिकत असलेला तनुज रविंद्र पानसरे पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत २२४ गुण मिळवून तालुक्यात शहरी भागात द्वितीय आला असून त्याची पुणे जिल्हा गुणवत्ता यादीत निवड झाली आहे. ओतूर येथील चैतन्य विद्यालयात शिकत असलेली स्वरा छगन पानसरे ब्रेन डेव्हलपमेंट परीक्षेत गोल्ड मेडल तसेच आय एम विनर या परीक्षेत राज्यात द्वितीय आली तीने पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत २४९ गुण मिळवूनजिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळविले आहे. राजगुरुनगर ता.खेड येथील महात्मा गांधी विद्यालयात शिकत असलेली सुमेधा विनायक पानसरे हिची २०२२-२३ मध्ये पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीत निवड झाली होती.२०२५-२६ मध्ये देखील पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत २३४ गुण मिळवून पुणे जिल्हा गुणवत्ता यादीत निवड झाली आहे. तीनही विद्यार्थी एकाच गावातील एकाच पानसरे कुटुंबातील असल्यामुळे मढ गाव व पानसरे परिवाराने इतिहास केल्याची चर्चा आहे. जुन्नर तालुक्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त भावी डॉक्टरांचा गौरव

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त आकाश शैक्षणिक सेवा मर्यादित यांनी वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या माजी विद्यार्थ्यांचा आणि तरुण वैद्यकीय व्यावसायिकांचा सन्मान करून देशाच्या आरोग्यसेवा क्षेत्रासाठी घडवलेल्या योगदानाचा गौरव केला. गेल्या ३७ वर्षांपासून वैद्यकीय प्रवेश परीक्षा मार्गदर्शन क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्थेने लाखो विद्यार्थ्यांना डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी दिलेल्या योगदानावर यावेळी प्रकाश टाकण्यात आला. कार्यक्रमात पुणे आणि परिसरातील दहा माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. हे विद्यार्थी सध्या डॉक्टर म्हणून कार्यरत असून काही जण वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत आहेत. त्यांच्या यशाचा गौरव करण्याबरोबरच त्यांना घडविणाऱ्या शिक्षकांच्या योगदानालाही यावेळी मान्यता देण्यात आली.




> या कार्यक्रमात सध्याच्या वैद्यकीय प्रवेश परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना माजी विद्यार्थ्यांच्या यशोगाथा ऐकण्याची तसेच त्यांच्या अनुभवांतून प्रेरणा घेण्याची संधी मिळाली. राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त आयोजित हा उपक्रम भावी डॉक्टरांना प्रोत्साहन देणारा आणि आरोग्यसेवा क्षेत्रासाठी सक्षम पिढी घडविण्याच्या संस्थेच्या वचनबद्धतेची पुन्हा एकदा साक्ष देणारा ठरला.

संस्थेने सांगितले की, गेल्या जवळपास चार दशकांत आठ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना वैद्यकीय प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होऊन वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले आहे. गेल्या दहा वर्षांत संस्थेच्या विद्यार्थ्यांनी वैद्यकीय प्रवेश परीक्षेत १३ वेळा अखिल भारतीय प्रथम क्रमांक मिळविला आहे. तसेच अव्वल दहा क्रमांकांमध्ये सुमारे ६४ टक्के, तर अव्वल शंभर क्रमांकांमध्ये ५० टक्के विद्यार्थ्यांनी स्थान मिळविले आहे.

यावेळी उपप्रादेशिक संचालक राहुल त्यागी यांनी सांगितले की, राष्ट्रीय डॉक्टर दिन हा समाजाच्या आरोग्यरक्षणासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या डॉक्टरांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. गेल्या ३७ वर्षांहून अधिक काळ विद्यार्थ्यांना डॉक्टर बनण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन करताना देशाच्या आरोग्यव्यवस्थेला सक्षम वैद्यकीय मनुष्यबळ देण्याचे कार्य संस्था सातत्याने करत आहे. माजी विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करण्याबरोबरच भावी डॉक्टर घडविण्याची आपली बांधिलकी अधिक दृढ करण्याचा हा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले.

देशात सध्या डॉक्टर आणि रुग्ण यांचे प्रमाण एक डॉक्टरमागे सुमारे ८११ रुग्ण इतके असल्याने आरोग्य क्षेत्राला अधिकाधिक कुशल डॉक्टरांची गरज आहे.

उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण, अनुभवी शिक्षक आणि विद्यार्थीकेंद्रित अध्यापन पद्धतीच्या माध्यमातून संस्था वैद्यकीय क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी सातत्याने मार्गदर्शन करत आहे.

## जुन्नरला पेपरफुटी विरोधात डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडियाची निदर्शने



**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया पुणे जिल्हा समितीच्या वतीने जुन्नर येथे NEET व TET पेपर फुटी च्या विरोधात भर पावसात जोरदार घोषणा देत निदर्शने करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांविरोधात युवकांनी घोषणाबाजी करत संताप व्यक्त केला. कार्यकर्त्यांनी हातात झेंडे घेऊन "पेपरफुटी बंद करा", "विद्यार्थ्यांना न्याय द्या", "दोषींना कठोर शिक्षा झालीच पाहिजे", "पारदर्शक परीक्षा व्यवस्था लागू करा" अशा घोषण दिल्या .

यावेळी डी वाय एफ आय पुणे जिल्हा सचिव डॉ. आशिष मेरूकर यांनी सांगितले की, "वारंवार होणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांमुळे लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व व्यावसायिक भविष्य धोक्यात येत आहे. अनेक वर्षे मेहनत घेऊन परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय होत असून, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे." DYFI ने NEET व TET पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष आणि उच्चस्तरीय चौकशी करून या रॅकेटमधील सर्व सूत्रधारांना तातडीने अटक करण्याची मागणी केली. तसेच दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करून भविष्यात अशा घटना पुन्हा घडणार नाहीत, यासाठी परीक्षा प्रणाली अधिक सुरक्षित व पारदर्शक करण्याची मागणी सहसचिव विलास साबळे यांनी केली. विद्यार्थी व युवकांच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष सुरूच राहील, असा निर्धार DYFI च्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. या आंदोलनात DYFI पुणे जिल्हा समितीचे सचिव डॉ. आशिष मेरूकर, जिल्हाध्यक्ष अमिन शेख, सहसचिव विलास साबळे, उपाध्यक्ष राजू शेळके, कोषाध्यक्ष अविनाश गवारी, आंबेगाव तालुका अध्यक्ष रोहिदास गभाले जुन्नर तालुकाध्यक्ष कृष्णा दुधवडे, दीपक वालकोळी आदी कार्यकर्ते उपस्थित होते. या निदर्शनात सहभागी होत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जुन्नर तालुका सचिव गणपत घोडे, आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंच समन्वयक संजय साबळे, एस एफ आय राज्य समिती सदस्य संदीप मरभळ यांनी पाठिंबा व्यक्त केला.

## १९ ते २१ जुलैदरम्यान २४१वा श्री वरदेंद्र तीर्थ स्वामीजी आराधना महोत्सव

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सदाशिव पेठ येथील नंजनगूड श्री वरदेंद्र राघवेंद्र स्वामी मठात पूज्य श्री वरदेंद्र तीर्थ स्वामीजी यांच्या 241 व्या आराधना महोत्सवाचे आयोजन 19 ते 21 जुलै 2026 या कालावधीत अत्यंत भक्तिमय, वैदिक आणि धार्मिक वातावरणात करण्यात आले आहे. या पवित्र महोत्सवासाठी महाराष्ट्रासह देशभरातून हजारो भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. हा महोत्सव परमपूज्य 108 श्री सुयतीन्द्र तीर्थ स्वामीजी यांच्या दिव्य आशीर्वादाने तसेच विद्यमान पीठाधीश्वर परमपूज्य 108 डॉ. श्री श्री श्री सुबुधेन्द्र तीर्थ स्वामीजी यांच्या पावन सान्निध्यात संपन्न होणार आहे. महोत्सवाची सुरुवात 18 जुलै रोजी सायंकाळी 5.00 वाजता ध्वजारोहण, प्रार्थना उत्सव, गो-पूजन आणि धान्यपूजनाने होईल. त्यानंतर 19 जुलै रोजी पूर्व आराधना, 20 जुलै रोजी मध्य आराधना आणि 21 जुलै रोजी उत्तर आराधना असे विशेष धार्मिक विधी पार पडतील.



## डोणजे येथे डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांची जयंती उत्साहात साजरी



**डोणजे (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रीय ऐक्य आणि भारताच्या अखंडतेसाठी आपले प्राण अर्पण करणारे भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांची जयंती डोणजे येथे उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या राष्ट्रसेवेच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना खडकवासला ग्रामीण भाजपचे अध्यक्ष नवनाथ तागुंदे म्हणाले, "डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी हे केवळ राजकीय नेते नव्हते, तर राष्ट्रएकात्मतेचे ज्वलंत प्रतीक होते. त्यांच्या त्यागातून 'राष्ट्र प्रथम' हा विचार प्रत्येकाने आत्मसात करणे आवश्यक आहे. आमदार भिमराव तापकीर यांच्या नेतृत्वाखाली त्यांचा आदर्श पुढे नेत एकसंघ, सक्षम आणि सशक्त भारताच्या निर्मितीसाठी आम्ही कटिबद्ध आहोत." या कार्यक्रमास दिव्यांग विकास आघाडी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष बाजीराव पारगे, दत्ताभाऊ पायगुडे, परशुराम तागुंदे, किरण खिरीड, शांताराम खिरीड, राजाभाऊ भामे, ताराबाई नानगुडे तसेच खडकवासला ग्रामीण भाजपचे पदाधिकारी, भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांनी राष्ट्रहितासाठी अखंडपणे कार्य करण्याचा संकल्प केला.

# विशेष मुलांच्या आयुष्यात आशेचा किरण ठरत आहे 'साहस फाउंडेशन'



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विशेष गरजा असलेल्या मुलांकडे समाजात अनेकदा दयेच्या भावनेने पाहिले जाते. मात्र, योग्य प्रशिक्षण, प्रोत्साहन आणि संधी मिळाल्यास ही मुलेही स्वावलंबी व आत्मविश्वासपूर्ण जीवन जगू शकतात, हा विश्वास प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध करणारे साहस फाउंडेशन गेल्या नऊ वर्षांपासून विशेष मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय कार्य करत आहे.

सन २०१७ मध्ये सामाजिक कार्यकर्ते सतीश खराडे यांनी स्थापन केलेली साहस फाउंडेशन ही पूर्णपणे ना-नफा तत्त्वावर कार्य करणारी संस्था असून पुणे व मुंबई परिसरातील शेकडो विशेष मुलांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याचे काम करत आहे. संस्थेचे मुख्य उद्दिष्ट विशेष मुलांना शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि जीवनकौशल्यांच्या माध्यमातून अधिक सक्षम व स्वावलंबी बनविणे हे आहे.

संस्थेची ३५ सदस्यांची समर्पित टीम विशेष मुलांच्या घरी जाऊन त्यांना शारीरिक तंदुरुस्ती, शरीराचा समन्वय, संतुलन, क्रीडा कौशल्ये, दैनंदिन जीवनातील स्वावलंबन तसेच सामाजिक कौशल्यांचा विकास यासाठी नियमित प्रशिक्षण देते. प्रत्येक मुलाने भविष्यात शक्य तितकी स्वतःची कामे स्वतः करण्यास सक्षम व्हावे आणि पालकांवरील अवलंबित्व कमी व्हावे, या उद्देशाने संस्था सातत्याने कार्यरत आहे. विशेष मुलांमध्ये आत्मविश्वास वाढविण्यासाठी साहस फाउंडेशनतर्फे ट्रेकिंग, फील्ड ट्रिप, साहसी उपक्रम, क्रीडा स्पर्धा, समूह उपक्रम आणि विविध कौशल्यविकास प्रशिक्षण कार्यक्रमांचे नियमित आयोजन केले जाते. सध्या संस्थेत १०० हून अधिक विद्यार्थी नियमित प्रशिक्षण घेत असून ५०० पेक्षा अधिक कुटुंबांना संस्थेने मार्गदर्शन, समुपदेशन आणि विविध प्रकारचा आधार दिला आहे. या सामाजिक उपक्रमात सहसंचालक मयूर लोणकर, तांत्रिक प्रमुख एकनाथ पाडेकर, सचिव वैभव गायकवाड, विशेष शिक्षिका सोनाली अहिरे, सुचेता पवार तसेच साहस फाउंडेशनची संपूर्ण टीम निस्वार्थ भावनेने योगदान देत आहे.

संस्थापक व संचालक सतीश खराडे यांनी सांगितले की, "विशेष मुलांमध्ये अमर्याद क्षमता आहे. त्यांना केवळ योग्य दिशा, सातत्यपूर्ण प्रशिक्षण आणि समाजाची स्वीकारार्हता मिळण्याची गरज आहे. प्रत्येक विशेष मुलाला सन्मानाने, स्वाभिमानाने आणि स्वावलंबीपणे जगता यावे, हेच साहस फाउंडेशनचे ध्येय असून त्यासाठी आम्ही

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
बुधवार, दि. ०८ जुलै २०२६





## थोडक्यात पण महत्वाचे




### २५ हजार पास्कल क्षमतेसह एल५० प्लस आणि एल५० दाखल

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : घरगुती स्वच्छतेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या ड्रीमे टेक्नॉलॉजीने भारतात एल५० प्लस आणि एल५० ही दोन नवी रोबोटिक स्वच्छता यंत्रे बाजारात दाखल केली आहेत. परवडणाऱ्या किमतीत उच्च क्षमतेची स्वच्छता, स्वयंचलित कार्यप्रणाली आणि बुद्धिमान नियंत्रण प्रणाली उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही उत्पादने सादर करण्यात आली आहेत. दोन्ही मॉडेल्समध्ये २५ हजार पास्कल सक्शन क्षमता, कडा व कोपरे प्रभावीपणे स्वच्छ करणारे मॉप एक्स्टेंड तंत्रज्ञान, गालिचा ओळखून पुसणीचा भाग वर उचलणारी बुद्धिमान मॉप लिफ्ट प्रणाली, अडथळे ओळखणारी प्रगत नेव्हिगेशन व्यवस्था आणि मोबाईल अनुप्रयोगाद्वारे नियंत्रण अशा सुविधा देण्यात आल्या आहेत. ड्रीमे इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक मनू शर्मा यांनी सांगितले की, भारतीय ग्राहक आता अधिक स्मार्ट आणि वेळ वाचवणाऱ्या तंत्रज्ञानाला प्राधान्य देत आहेत. त्यामुळे प्रगत स्वच्छता तंत्रज्ञान सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणण्याचा कंपनीचा प्रयत्न असून, एल५० मालिकेद्वारे घरगुती स्वच्छतेसाठी नवा मापदंड निर्माण होईल.

### 'सतलज' या आणखी एका धाडसी आणि आशयघन कथेची मेजवानी




नवी दिल्ली (आरंभ पर्व) : धाडसी, समकालीन आणि विचार करायला लावणाऱ्या कथांसाठीचे प्रभावी व्यासपीठ म्हणून ZEE5 ने आपली ओळख अधिक दृढ केली असून, या प्रवासातील पुढचे पाऊल म्हणून आज 'सतलज' या भावस्पर्शी चित्रपटाचा प्रीमियर करण्यात आला आहे. सत्यघटनांपासून प्रेरित असलेला हा चित्रपट केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता धैर्य, हानी आणि न्यायासाठीच्या अथक संघर्षाची कथा मांडतो. हनी त्रेहान यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटाची निर्मिती आरएसव्हीपी आणि मॅकगफिन पिक्चर्स यांनी केली आहे. दिलजीत दोसांझ यांच्यासोबत अर्जुन रामपाल, कंवलजीत सिंह, सुविंदर विक्की आणि गीतिका विद्या ओहल्यान यांच्या महत्त्वाच्या भूमिका असून हा चित्रपट आता केवळ हिंदी ZEE5 वर स्ट्रीम होत आहे. मानवाधिकार कार्यकर्ते जसवंत सिंह यांच्या जीवनावर प्रेरित असलेली 'सतलज' ही भीती, सत्तेचा दबाव आणि मौन यांच्या छायेत सत्याचा अखंड शोध घेणाऱ्या एका व्यक्तीची निर्भीड कथा आहे. संघर्ष आणि अस्थिरतेच्या काळातील पार्श्वभूमीवर घडणारा हा चित्रपट गूढरीत्या बेपत्ता झालेल्या हजारो लोकांचे भयावह वास्तव आणि न्यायाच्या शोधात भटकणाऱ्या त्यांच्या कुटुंबांनी सोसलेली अमानुष वेदना उलगडतो. सत्य दडपण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यवस्थेला आव्हान देणारी कृती हेच सर्वांत मोठे धाडस असते, याची प्रभावी जाणीव करून देणारी ही कथा आहे.

### क्रेझी क्रेटोसने विजेतेपद पटकावले




पुणे (आरंभ पर्व) : रायझिंग स्टार रोहित "क्रॅटोस" सक्सेना च्या नेतृत्वाखालील 'क्रेझी क्रॅटोस' संघाने क्राफ्टन इंडिया ई-स्पोर्ट्स रायझिंग स्टार्स प्रोग्राम मधील खेळाडूंसाठी खास आयोजित केलेल्या, भारतातील पहिल्या बीजीएमआय न्व्हिटेशनल स्पर्धेत 'क्राफ्टन इंडिया रायझिंग स्टार इन्विटेशनल 2026' मध्ये विजेतेपद पटकावले. तीन दिवस चाललेल्या आणि एकूण 18 सामन्यांमध्ये रंगलेल्या चुरशीच्या स्पर्धेनंतर क्रेझी क्रॅटोस ने 193 गुण आणि तीन विनर विनर चिकन डिनर्स (डब्ल्यूडब्ल्यूसीडी) मिळवत विजेतेपद मिळवले. जस्टीज जेस्टर्स संघाने 166 गुणांसह उपविजेतेपद मिळवले, तर मोस्ट वॉन्टेड संघाने 146 गुण आणि दोन डब्ल्यूडब्ल्यूसीडी च्या जोरावर तिसरे स्थान पटकावले. या उल्लेखनीय कामगिरीत आणखी भर घालत, संपूर्ण स्पर्धेदरम्यान आपल्या संघाचे सातत्यपूर्ण आणि प्रभावी नेतृत्व केल्याबद्दल रोहित "क्रॅटोस" सक्सेना यांना स्पर्धेतील 'मोस्ट व्हॅल्युएबल प्लेअर (एमव्हीपी)' आणि 'बेस्ट रायझिंग स्टार' हे दोन्ही मानाचे पुरस्कार प्रदान करण्यात आले. 3 ते 5 जुलैदरम्यान आयोजित या तीन दिवसीय स्पर्धेत 16 रायझिंग स्टार्सनी प्रत्येकी पाच सदस्यांच्या आपल्या संघांचे नेतृत्व केले. ₹ 5 लाखांच्या एकूण बक्षीस रकमेसाठी झालेल्या या स्पर्धेतील सर्व सामने क्राफ्टन इंडिया ईस्पोर्ट्स च्या अधिकृत यूट्यूब चॅनेलवर थेट प्रक्षेपित करण्यात आले.

### आयडीएफसी फर्स्ट बँकेतून आता भविष्य निर्वाह निधी भरण्याची सुविधा

मुंबई (आरंभ पर्व) : आयडीएफसी फर्स्ट बँकेने कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना (ईपीएफओ)च्या प्रणालीशी यशस्वी जोडणी पूर्ण करत भविष्य निर्वाह निधी (पीएफ) भरण्याची डिजिटल सेवा सुरू केली आहे. भारत सरकारच्या श्रम व रोजगार मंत्रालयांतर्गत कार्यरत कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने भविष्य निर्वाह निधी देयके स्वीकारण्यासाठी आयडीएफसी फर्स्ट बँकेला अधिकृत मान्यता दिली आहे. या सुविधेमुळे उद्योग आणि आस्थापनांना कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या संकेतस्थळावरून थेट भविष्य निर्वाह निधीची देयके सुरू करता येणार असून, आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या वैयक्तिक आणि उद्योगांसाठीच्या इंटरनेट बँकिंग सेवेद्वारे ती सुरक्षितपणे पूर्ण करता येणार आहेत. या डिजिटल सुविधेमध्ये व्यवहारांची तत्काळ पुष्टी, वापरण्यास सुलभ प्रणाली, चालान त्वरित डाउनलोड करण्याची सुविधा तसेच नोंदी आणि हिशोब जुळविण्याची सोपी व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे उद्योग-आस्थापनांना वैधानिक देयकांची पूर्तता अधिक जलद आणि अचूक पद्धतीने करता येणार आहे. या सेवेच्या प्रारंभप्रसंगी आयडीएफसी फर्स्ट बँकेचे किरकोळ ठेवी विभागाचे प्रमुख आशिष सिंह म्हणाले, "उद्योग-आस्थापनांसाठी कायदेशीर देयकांची वेळेत पूर्तता करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेशी जोडणी झाल्यामुळे ग्राहकांना आता आमच्या डिजिटल बँकिंग सुविधेद्वारे भविष्य निर्वाह निधीची देयके जलद, सुरक्षित आणि सहज भरता येतील. ग्राहकांचा वेळ आणि श्रम वाचविणाऱ्या सोप्या बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्याच्या आमच्या प्रयत्नातील हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे." आयडीएफसी फर्स्ट बँक ही प्रत्यक्ष कर, वस्तू व सेवा कर, सीमा शुल्क आणि कर्मचारी भविष्य निर्वाह निधीशी संबंधित वैधानिक देयके स्वीकारणाऱ्या मोजक्या बँकांपैकी एक आहे. एकाच डिजिटल व्यासपीठावर विविध प्रकारच्या बँकिंग सेवा उपलब्ध करून देत ही बँक उद्योग आणि व्यावसायिकांच्या दैनंदिन व्यवहारांना अधिक सुलभ बनवत आहे.

# रिंगरोडच्या कामादरम्यान चिखलात उतरलेल्या वीजप्रवाहाचा फटका

## शेतकऱ्याचे दोन बैल दगावले, भरत सुर्वे यांचा जीव थोडक्यात बचावला



**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

पुणे रिंगरोडच्या कामाच्या परिसरात चिखलात उतरलेल्या वीजप्रवाहामुळे दोन बैलांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना आज (सोमवार) सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास वरदाडे ता.हवेली येथे घडली. या दुर्घटनेत शेतकरी भरत बाबुराव सुर्वे यांचा जीव थोडक्यात बचावला असून, त्यांच्या शेतीसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या दोन बैलांचा मृत्यू झाल्याने कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भरत बाबुराव सुर्वे हे नेहमीप्रमाणे दोन बैलांना घेऊन शेताच्या दिशेने जात होते. रिंगरोडच्या कामामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात चिखल साचला होता. याच चिखलात वीजप्रवाह उतरल्याने बैलांना अचानक जोरदार विजेचा धक्का बसला. काही क्षणांतच दोन्ही बैल जागीच कोसळले आणि त्यांचा मृत्यू झाला. घटना घडताच भरत सुर्वे यांनी प्रसंगावधान राखत तात्काळ बाजूला धाव घेतल्याने त्यांचा जीव वाचला. अन्यथा ही दुर्घटना आणखी भीषण ठरली असती. घटनेची माहिती मिळताच पोलीस, महावितरण तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) चे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला असून, वीजप्रवाह चिखलात नेमका कशामुळे उतरला, याची चौकशी सुरू करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हे काम RVR कंपनी करत असल्याचे संबंधित ग्रामस्थांनी सांगितले. रिंगरोडच्या कामादरम्यान सुरक्षिततेच्या उपाययोजनांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी संबंधित यंत्रणांनी तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, दरम्यान, बैल हे शेतकऱ्याचे महत्त्वाचे आर्थिक साधन असल्याने या दुर्घटनेमुळे भरत बाबुराव सुर्वे यांचे मोठे नुकसान झाले आहे. शासनाने तातडीने पंचनामा करून योग्य आर्थिक मदत द्यावी, तसेच या घटनेस जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी सर्वपक्षीय नेते व नागरिकांनी केली आहे.

> कष्टकरी शेतकरी कुटुंबाचे हे मोठे नुकसान झाले आहे. त्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी ही मागणी आहे. आ.भीमराव तापकीर यांच्याशी बोलणे झाले असून लवकरच याबाबत सविस्तर माहिती घेऊन कार्यवाही करू असे सांगितले.
>
> **- नवनाथ तागुंदे, अध्यक्ष भाजपा खडकवासला ग्रामीण**

> गोरगरीब शेतकरी बांधवांचे जे नुकसान झाले आहे ते तातडीने भरून द्यायला पाहिजे.. पुणे रिंग रोड कामाबाबत या कंपनीच्या विरोधात अनेक तक्रारी आहेत. त्यांनी योग्य कार्यवाही न केल्यास शिवसेना तीव्र आंदोलन करेल.
>
> **- शिवाजीराव मते पाटील, खडकवासला विधानसभा प्रमुख शिवसेना (उ.बा.ठा)**

## 'रामायण'मधील प्रभू रामाच्या पहिल्या लूकमागील दागिन्यांचे रहस्य

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्या बहुचर्चित 'रामायण' चित्रपटातील भगवान रामाच्या भूमिकेतील रणबीर कपूरचा पहिला लूक प्रदर्शित झाल्यानंतर त्यामागील दागिन्यांची कलात्मक निर्मितीही चर्चेचा विषय ठरली आहे. चित्रपटाचे अधिकृत दागिने भागीदार ट्राइब अम्रपाली यांनी प्रभू रामासह प्रमुख पात्रांसाठी भारतीय परंपरा, पुराणकथा आणि उत्कृष्ट हस्तकलेचा संगम साधणारे वैशिष्ट्यपूर्ण दागिने तयार केले आहेत. दिवाळी २०२६ आणि २०२७ मध्ये दोन भागांत प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटात रणबीर कपूर भगवान राम, साई पल्लवी सीता, यश रावण, सनी देओल हनुमान तर रवि दुबे लक्ष्मण यांच्या भूमिका साकारणार आहेत.



ट्राइब अम्रपालीने या प्रकल्पासाठी तब्बल १८ महिन्यांहून अधिक काळ संशोधन केले. अम्रपाली ज्वेल्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सर्जनशील संचालक तरंग अरोरा यांच्या नेतृत्वाखालील डिझाइन टीमने पुराणकथा, मंदिरशिल्प, प्राचीन भारतीय अलंकारकला, शिल्पकला आणि धार्मिक प्रतीकांचा सखोल अभ्यास करून चित्रपटासाठी स्वतंत्र दागिन्यांची दृश्यशैली विकसित केली.

## शिवराज्याभिषेक दिनानिमित्त प्रेरणादायी व्याख्यान उत्साहात संपन्न

### न्यू आर्या फाउंडेशन व शिववंदना मित्र परिवाराचा संयुक्त उपक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शिववंदना मित्रपरिवार, धायरी व न्यू आर्या फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शिवराज्याभिषेक दिन व हिंदू साम्राज्य दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेले सुप्रसिद्ध इतिहास अभ्यासक श्री. नागेश पाटील यांचे जाहीर व्याख्यान अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडले.

यावेळी मार्गदर्शन करताना श्री. नागेश पाटील म्हणाले की, "छत्रपती शिवाजी महाराजांनी संकटांच्या काळात स्वराज्य टिकविण्यासाठी आणि उभे करण्यासाठी दाखविलेली जिद्द, पराक्रम व कर्तृत्व ही आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे.




त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत प्रत्येकाने आपल्या क्षेत्रात कर्तृत्व सिद्ध करून समाज आणि राष्ट्रासाठी योगदान दिले पाहिजे." असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रस्ताविकेत प्राज भिलारे यांनी छत्रपती शिवरायांच्या हिंदवी स्वराज्याच्या विचारांवर चालत समाजहिताचे कार्य करण्याचे आवाहन केले. "आजच प्रेरणा घेऊन आजपासूनच समाजासाठी विधायक कार्याला सुरुवात करूया," असे त्यांनी उपस्थितांना सांगितले.

या कार्यक्रमास दिव्यांग विकास आघाडीचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष बाजीराव पारगे, मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे, भाजप प्रभाग अध्यक्ष राजू दादा कुटे, गणेश पोकळे, व्यंकटसाई होंडाचे संतोष कदम तसेच शिववंदना मित्रपरिवाराचे प्राज भिलारे यांच्यासह अनेक शिवप्रेमी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अत्यंत रोमहर्षक, प्रेरणादायी आणि राष्ट्रभक्तीच्या वातावरणात हा व्याख्यान सोहळा उत्साहात संपन्न झाला.

## चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते वारकरी सेवा अभियानाचे उद्घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पंढरपूर वारीच्या निमित्ताने वारकऱ्यांच्या सेवेसाठी फिनोलेक्स पाईप्सने विविध सामाजिक उपक्रम सुरू केले असून, या उपक्रमाचे उद्घाटन मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.




संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर फिनोलेक्स पाईप्सत आणि सीएसआर भागीदार मुकुल माधव फाउंडेशनच्या माध्यामातून वारकऱ्यांना युटिलिटी बॅग, पावसाळी घोंगता आणि आधारासाठी काठी यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करण्यात येत आहे. वारी मार्गावर मोफत आरोग्य शिबिरे, औषधोपचार आणि आरोग्य तपासणीची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

याशिवाय पोलिसांना रेनकोट, क्विक रिस्पॉन्स टीमला विशेष जॅकेट्स, माहिती फलक, तसेच हरित वारीसाठी वृक्षारोपण आणि कचरापेट्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. या उपक्रमाचे उद्घाटन मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी फिनोलेक्स पाईप्स आणि मुकुल माधव फाउंडेशनचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे कार्यकारी अध्यक्ष प्रकाश पी. छाब्रिया आणि मुकुल माधव फाउंडेशनच्या विश्वस्त रितु पी. छाब्रिया यांच्या मार्गदर्शनाखाली हा सेवा उपक्रम राबविण्यात येत आहे.

## ज्ञान, कौशल्य व कृतीधारित अभ्यासक्रम असावा - डॉ. प्रभाकर देसाई

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

नवीन शैक्षणिक धोरणामध्ये अभ्यासक्रमाचे स्वरूप लवचिक व सर्वव्यापक झाले आहे. या पार्श्वभूमीवर मराठी अभ्यास मंडळाने नेमकेपणाने अभ्यासक्रम तयार करताना काही प्रमाणात स्थानिकीकरण करावे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ज्ञान, कौशल्य व कृतीधारित अभ्यासक्रम तयार करावा असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रभाकर देसाई यांनी केले.



ते येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत आयोजित तृतीय वर्ष अभ्यासक्रम एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.



# 'स्पर्श ममतेचा उपक्रमातून गरजूंना अन्नदान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

समाजातील वंचित, गरजू आणि उपाशी व्यक्तींच्या जीवनात आनंदाचे क्षण निर्माण करण्यासाठी 'महालक्ष्मी इव्हेंट्स अँड केटरर्स' तर्फे 'स्पर्श ममतेचा – Part 2' या अनोख्या सामाजिक उपक्रमाची यशस्वी सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत दर शुक्रवारी आपल्या घरचे प्रेमाने बनवलेले ताजे जेवण खऱ्या अर्थाने गरजू आणि अन्नाची गरज असलेल्या व्यक्तीपर्यंत पोहोच करायचे आहे.

हा केवळ अन्नदानाचा उपक्रम नसून, त्यामागे माणुसकी, प्रेम आणि आपुलकीचा स्पर्श देण्याचा पवित्र उद्देश आहे. या उपक्रमाची संकल्पना महालक्ष्मी इव्हेंट्सच्या सर्वेसर्वा सोनू जोशी यांची असून, सहभागी महिलांनी जेवण देतानाचा एक फोटो किंवा छोटा व्हिडिओ ग्रुपमध्ये शेअर करायचा आहे, जेणेकरून समाजातील इतर नागरिकांनाही यापासून प्रेरणा मिळेल. यामध्ये तब्बल 50+ महिलांनी अत्यंत उत्साहाने सहभाग नोंदवला आहे. या उपक्रमासाठी चेतना बडवे, रेखा कांबळे, अमृता सुर्वे, मनीषा समर्थ, पूनम महेंद्रकर, राखी येवले, रुपाली धनावडे यांचे विशेष सहकार्य लाभले.

या उपक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, 'स्पर्श ममतेचा – Task 2' मध्ये ज्या मैत्रिणी नियमितपणे आणि सर्व नियमांचे पालन करून सहभाग घेतील, त्यांचे महालक्ष्मी इव्हेंट्सतर्फे विशेष कौतुक केले जाईल. अशा नियमित महिलांना संस्थेतर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या पुढील आगामी ट्रिपसाठी 'Direct Enroll' (थेट प्रवेश) दिला जाणार आहे. ही ट्रिप म्हणजे महिलांनी समाजासाठी केलेल्या सुंदर आणि निस्वार्थी कार्याची एक कौतुक थाप असणार आहे. "माणुसकीचा स्पर्श देऊया आणि या सुंदर प्रवासाचाही भाग बनूया," असे आवाहन सोनू जोशी यांनी केले आहे. घरच्या जेवणाच्या एका घासाने एखाद्या उपाशी व्यक्तीच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलवण्याचा हा छोटासा प्रयत्न समाजात नक्कीच एक नवा आदर्श निर्माण करेल, यात शंका नाही.

**१. भुकेलेल्यांना अन्न देऊन लाभणारे आत्मिक समाधान**

एका महिला सदस्याने आपला अनुभव सांगताना लिहिले की, गणेश चतुर्थीच्या दिवशी उपवास असूनही त्यांनी एका गरजू आणि काम न करू शकणाऱ्या वृद्ध आजींसाठी घरी येऊन पुन्हा गरमागरम साबुदाणा खिचडी बनवली. आजींना जेवण दिल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर जे निरागस आणि समाधानाचे हसू उमलले, ते पाहून स्वतःचेच पोट भरल्याची भावना निर्माण झाली. दिवसभर स्वतःला खायला वेळ मिळाला नाही, तरीही या उपक्रमामुळे मनाला इतका आनंद मिळाला की अजिबात थकवा जाणवला नाही, उलट शरीर आणि मन एका वेगळ्याच उत्साहाने भरून गेले.

**२. मदतीचे हात म्हणजेच देवाचे रूप**

रेखा कांबळे यांनी अत्यंत भावूक शब्दांत आपल्या भावना मांडल्या आहेत. त्यांच्या मते, प्रत्येकाच्या नशिबात पोटभर जेवण नसते, पण देव कोणा ना कोणा देवदूताला नक्की पाठवतो. या उपक्रमाच्या माध्यमातून दिलेला प्रत्येक घास हा केवळ अन्न नसून ते प्रेम, आपुलकी आणि समोरच्याला जगण्याची नवी उमेद देणारा आशीर्वाद होता. गरजूंचे तृप्त चेहरे आणि डोळ्यांतील आनंदाश्रू पाहून अशी प्रचिती आली की, देव केवळ मंदिरात नसून अशा कठीण प्रसंगी मदतीसाठी पुढे सरसावलेल्या हातांमध्येच वास करतो.

# दाऱ्याघाट : सह्याद्रीच्या कुशीत लपलेला निसर्गाचा ठेवा

(दै. आरंभ पर्व)

**सह्याद्री म्हणजे महाराष्ट्राची जीवनरेखा. या पर्वतरांगांच्या कुशीत अनेक निसर्गरम्य ठिकाणे लपलेली आहेत. त्यातीलच एक अजोड रत्न म्हणजे जुन्नर तालुक्यातील आंबोलीचा दाऱ्याघाट. पुणे जिल्ह्याचे शेवटचे टोक असले हे गाव आजही आपले आदिम सौंदर्य जपून आहे. धबधब्याचा खळखळाट, डोंगरांची उंची आणि आदिवासी संस्कृतीचा सुगंध - यांचा संगम म्हणजे दाऱ्याघाट.**



**भौगोलिक वैभव :** जुन्नरपासून 22 किमी अंतरावर वसलेल्या आंबोली गावात सुमारे 300 कुटुंबे आणि 2000 लोकांची वस्ती आहे. येथील ढाकोबा पर्वतरांग ही कळसुबाईनंतरची सह्याद्रीतील दुसरी उंच शिखररांग आहे. या रांगेच्या कुशीतूनच पवित्र मीना नदीचा उगम होतो. घनदाट वनराई, औषधी वनस्पती आणि जैवविविधतेने नटलेला हा परिसर पर्यावरणप्रेमींसाठी पर्वणी आहे. धरण क्षेत्रामुळे सभोवती बागायतीचे हिरवे पट्टे तयार झाले आहेत.

**स्थानिक जीवनाची झलक :** येथील आदिवासी बांधवांचे मुख्य व्यवसाय शेती, पशुपालन आणि भातशेती आहेत. पूर्वी उन्हाळ्यात हिरडा या औषधी वनस्पतीच्या विक्रीतून अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह चालत असे. पण शासकीय धोरणांमुळे हिरड्याला पर्याय मिळाल्याने त्याचे मोल कमी झाले आणि आदिवासी शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले. तरीही त्यांचे साधेपण, पाहुणचार आणि निसर्गाशी असलेली नाळ आजही अबाधित आहे.

**पर्यटकांचे स्वर्ग**

दाऱ्याघाटाचे खरे सौंदर्य पावसाळ्यात खुलते.

• सुभाष मोहरे •

ग्रामस्थ, दाऱ्याघाट पर्यटन स्थळ, आंबोली, ता. जुन्नर, जि. पुणे

1. **सांडधारा धबधबा:** स्वच्छ, पारदर्शक आणि सुरक्षित पाण्यामुळे कुटुंबासह भेट देण्यास योग्य.
2. **नैसर्गिक वनसंपदा:** ढाकोबा वन, वांदरलिंग आणि 'घोड्याचा नाल' परिसर ट्रेकर्सना मोहवतो.
3. **दुर्मिळ दृश्य:** ढाकोबा शिखरावरून दिसणारा कोकणातील ढगाळ निसर्ग, दुर्गादेवी, हरिश्चंद्रगड, मच्छिंद्रनाथ-गहिनीनाथ गड, चावंड-हडसर-निमगिरी किल्ल्यांची रांग मनात घर करून जाते.
4. **रानफुलांचा कालीन:** दसऱ्यानंतर येथे उमलणारी रानफुले साताऱ्याच्या कास पठारालाही लाजवतील इतकी रंगीबेरंगी आणि मनमोहक असतात.

जांभूळ, करवंदे, आवळे, तांदळाच्या भाकरीचा स्वाद आणि आदिवासींचे पारंपरिक लोकजीवन येथे अनुभवता येते. शहराच्या गोंगाटापासून दूर, निवांत क्षण घालवण्यासाठी हे ठिकाण उत्तम आहे. दाऱ्याघाट म्हणजे केवळ धबधबा नाही, तर सह्याद्रीने जपलेले एक जिवंत संग्रहालय आहे.

निसर्ग, इतिहास, संस्कृती आणि शांतता यांचा संगम पाहायचा असेल तर एकदा तरी आंबोलीला भेट द्याच. निसर्गाला जपा, कचरा करू नका आणि स्थानिक लोकांना पर्यटनातून रोजगार मिळवून द्या. चला तर मग, सह्याद्रीच्या कुशीतल्या या निसर्गरम्य दाऱ्याघाटाला भेट देऊया!

## थोडक्यात पण महत्वाचे



### आंदोलनकर्त्या कार्यकर्त्यांचा शशिकांत शिंदे यांच्या हस्ते गौरव

पुणे (आरंभ पर्व) : पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरात हातभट्टीच्या अवैध दारूमुळे निष्पाप नागरिकांचा बळी गेल्यानंतर आदरणीय रोहितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली हडपसर परिसरातील अवैध दारू अड्ड्यांविरोधात तीव्र आंदोलन छेडणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या कार्यकर्त्यांचा पुणे शहर कार्यकारिणीच्या बैठकीत विशेष सन्मान करण्यात आला. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या हस्ते पुणे शहर युवक अध्यक्ष किशोर कांबळे, समीर पवार, लखन वाघमारे, ऋषिकेश देखने, अशोक बेंद्रे आणि विक्रम जाधव यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना शशिकांत शिंदे म्हणाले, "हा सन्मान केवळ व्यक्तींचा नसून जनहितासाठी निस्वार्थ भावनेने लढणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या परिश्रमांचा आणि समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचा गौरव आहे. अवैध धंद्यांविरोधात लढणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पाठीशी पक्ष कायम ठामपणे उभा राहील."या प्रसंगी ज्येष्ठ नेते अंकुश काकडे, नगरसेवक काकासाहेब चव्हाण, गटनेते नगरसेविका अनिताताई इंगळे, नगरसेवक गफूरभाई पठाण, त्र्यंबक (अण्णा) मोकाशी, युवक अध्यक्ष अतुल (आप्पा) धावडे, कार्याध्यक्ष अजिंक्य पालकर, सोशल मीडिया अध्यक्ष किशोर बुंदगे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

### महामार्गावरील पुरामुळे एसटी वाहतूक ठप्प; प्रवाशांचा सात तास खोळंबा



राजगुरूनगर (आरंभ पर्व) : मुसळधार पावसामुळे पुणे- नाशिक महामार्ग खेड तालुक्यातील वाकी खुर्द गावाच्या हद्दीतील ओढ्याला संततधार पावसामुळे मोठा पूर आल्याने आणि थेट महामार्गावर पाच फुटांपर्यंत पाणी साचल्याने वाहतूक ठप्प झाली होती. ओढ्यावर असलेल्या बेसुमार अतिक्रमणाचा फटका परिसराला बसला असून पुराचं पाणी नदीकडे जाण्यात अडथळा निर्माण झाला. यामुळे पुणे नाशिक महामार्गाच्या सखल भागात तुडुंब पाणी साचून पुणे नाशिक महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. त्यामुळे एसटीच्या प्रवाशांना मोठा फटका बसला. तसेच खबरदारीचा उपाय म्हणून नाशिकहून पुण्याकडे जाणाऱ्या सर्व एसटी गाड्या राजगुरूनगर एसटी बसस्थानकावर थांबवून ठेवण्यात आल्या होत्या. सुमारे सात तास प्रवासी राजगुरूनगर एसटी बसस्थानकावर थांबून होते. पुणे नाशिक महामार्ग ठप्प झाल्यानं राजगुरुनगर आणि चाकण अशा दोन्ही बाजूंनी वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. उत्तर पुणे जिल्हा आणि नाशिक बाजूकडून पुणे, मुंबई व पिंपरी चिंचवडला येणाऱ्या लोकांची मोठी गैरसोय झाली होती. पुण्याकडे जाणारे बहुतांश रस्ते ठप्प झाल्याने वाहनचालक व प्रवाशांचे अतोनात हाल झाले. पुण्यासह वेगवेगळ्या गावांमधून चाकण औद्योगिक वसाहतीत जाणाऱ्यांना रस्ताच नाही. तसंच कामगार घेऊन येणाऱ्या कंपन्यांच्या बस आणि स्वतःच्या वाहनाने येणाऱ्या कामगारांची वाहने पुराच्या पाण्यात अडकली होती. वाकी खुर्द येथे मार्गावरील पाणी दुपारी जेसीबी मशीनने काढून देण्यात आले. परंतु पावसाचा जोर वाढत असल्याने पाणी काही कमी होत नव्हते. मार्गाच्या दोन्ही बाजूला असलेल्या रहिवासी वस्त्यांना याचा मोठा फटका बसला. गेल्या चार दिवसांपासून पुण्यात सुरू असलेल्या दमदार पावसामुळे महामार्गावर वाकी येथे पूरस्थिती निर्माण झाली.

### रेटवडी येथे पुराच्या पाण्यात तरुण वाहून गेला

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : खेड तालुक्यातील रेटवडी येथे अतिवृष्टीमुळे ओढ्याला आलेल्या पुराच्या पाण्याचा अंदाज न आल्यामुळे एक तरुण पाण्यात वाहून गेल्याची दुर्दैवी घटना सोमवारी (दि. ६ ) सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास घडली. समीर भिमाजी जाधव (वय ३० रा. रेटवडी, खालची ठाकरवाडी, ता खेड ) असे वाहून गेलेल्या तरुणाचे नाव आहे. खेड तालुक्यात शनिवारी रात्रीपासून पावसाने थैमान घातले आहे. सरीवर सरी येत असून तालुक्यातील ओढ्या नाल्यांना पूर आले आहेत. रस्ते पाण्याखाली गेले आहेत. रेटवडी येथे एका दुकानात खालची ठाकरवाडी येथून समीर जाधव हा दुचाकीवर घरगुती चीजवस्तु घेण्यासाठी आला होता. घरी परत जाताना सतारकावस्ती कडे जाणाऱ्या रस्त्यावर बंगलावस्ती येथील ओढ्याला मोठा पूर आला होता. नेहमीचा सवईचा रस्ता असल्याने ओढ्याच्या पुलावरून पाणी वाहत असतानाही जाधव यांनी दुचाकी मोटारसायकल तशीच चालविण्याचा प्रयत्न केला. परंतु पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्याने समीर जाधव दुचाकीसह वाहून गेला. दुचाकी रस्त्याच्या दगडांना अडकल्यामुळे सापडली आहे.

# रक्ताच्या कर्करोगावरील अत्याधुनिक उपचारांना नवी दिशा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हडपसर येथे राहणारे 46 वर्षीय मेकॅनिकल इंजिनिअर ऋतिक मेहरा यांच्यासाठी जानेवारी 2026 मधील नियमित वार्षिक आरोग्य तपासणी आयुष्याला कलाटणी देणारी ठरली. कोणतीही लक्षणे नसताना आणि नेहमीप्रमाणे काम सुरू असतानाच त्यांच्या रक्त तपासणीत हिमोग्लोबिनचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे आढळले. पुढील तपासणीत त्यांना IgA लॅम्बडा (Lambda) मल्टीपल मायलोमा या अस्थिमज्जेतील प्लाझ्मा पेशींमध्ये होणाऱ्या रक्ताच्या कर्करोगाचे निदान झाले. IgA लॅम्बडा (Lambda) मल्टीपल मायलोमा हा प्लाझ्मा पेशींचा (Plasma Cells) एक प्रकारचा कर्करोग आहे, ज्यामध्ये शरीरातील असामान्य प्लाझ्मा पेशी लॅम्बडा लाईट चेन (Lambda Light Chain) नावाचे मोनोक्लोनल प्रोटीन जास्त प्रमाणात तयार करतात। सामान्यतः आपल्या शरीरातील प्लाझ्मा पेशी संसर्गाशी लढण्यासाठी अँटीबॉडीज बनवतात, परंतु या आजारात त्या निकामी आणि हानिकारक प्रोटीन्स बनवू लागतात. "उपचारांपेक्षा कर्करोगाचे निदान स्वीकारणे माझ्यासाठी अधिक कठीण होते," असे ऋतिक मेहरा यांनी सांगितले. "मी पूर्णपणे सामान्य आयुष्य जगत होतो आणि मला कोणतीही लक्षणे नव्हती. नियमित आरोग्य तपासणीतून अचानक कर्करोग झाल्याचे समजल्याने मोठा धक्का बसला. मात्र माझ्या पत्नीने संपूर्ण काळात मला सकारात्मक राहण्यासाठी प्रोत्साहन दिले. उपचार आणि स्टेम सेल प्रत्यारोपणाची प्रक्रिया माझ्या अपेक्षेपेक्षा खूपच सुरळीत झाली आणि आता मी हळूहळू माझ्या दैनंदिन आयुष्यात परतत आहे."

# खडकवासला धरणावर पारंपरिक जलपूजन

## पुणेकरांसाठी वर्षभर मुबलक पाणीपुरवठ्याची महापौर नागपुरे यांची प्रार्थना

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणेकरांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असलेले खडकवासला धरण १०० टक्के भरल्याने शहराचा पाणीप्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागला आहे. यानिमित्ताने पुणे महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे खडकवासला धरणावर पारंपरिक पद्धतीने जलपूजन करण्यात आले.

पुणे महानगरपालिकेच्या महापौर मंजुषा नागपुरे यांच्या हस्ते साडी, चोळी व नारळ अर्पण करून जलदेवतेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. तसेच पुणेकरांना वर्षभर पुरेसा व सुरळीत पाणीपुरवठा व्हावा आणि शहरावर कोणतीही पाणीटंचाई येऊ नये, अशी प्रार्थना करण्यात आली.



यावेळी महापौर मंजुषा नागपुरे म्हणाल्या, "खडकवासला धरण पूर्ण क्षमतेने भरल्याचा आनंद संपूर्ण पुणेकरांचा आहे. जल ही निसर्गाची अमूल्य देणगी असून प्रत्येक नागरिकाने त्याचा जबाबदारीने आणि काटकसरीने वापर करणे ही काळाची गरज आहे. पुणेकरांना वर्षभर अखंड व पुरेसा पाणीपुरवठा व्हावा, हीच जलदेवतेच्या चरणी आमची प्रार्थना आहे. जलसंवर्धनाची जबाबदारी प्रशासनाबरोबरच प्रत्येक नागरिकाने स्वीकारणे आवश्यक आहे."

याप्रसंगी खडकवासल्याचे आमदार भीमराव तापकीर, उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेवक काकासाहेब चव्हाण, ॲड. प्रसन्नदादा जगताप, सचिन मोरे, सुभाष नाणेकर, भारतभूषण बराटे, नगरसेविका अनिता इंगळे, कोमल नवले, जयश्री भूमकर, भाजप महिला मोर्चा अध्यक्षा मनीषा मोरे, मंडलाध्यक्ष विजय मते, भाजप ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव दत्ताभाऊ कोल्हे, ओबीसी मोर्चा सचिव रमेशबापू गायकवाड, भारतीय जनता युवा मोर्चा खडकवासला अध्यक्ष निखिल धावडे , जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. जलसंवर्धन, पाण्याचे महत्त्व आणि पाण्याचा जपून वापर करण्याचा संदेशही उपस्थितांनी दिला. कार्यक्रमास स्थानिक नागरिक, पुणे महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी तसेच पाटबंधारे विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू

## जलपूजनानिमित्त नगरसेवक सुभाष नाणेकर यांच्याकडून मान्यवरांचा सत्कार





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू झाल्याच्या पार्श्वभूमीवर आज धरण परिसरात पारंपरिक पद्धतीने विधिवत जलपूजन करण्यात आले. खडकवासला मतदारसंघाचे आमदार मा. भीमराव तापकीर, पुण्यनगरीच्या महापौर मा. मंजुषा नागपुरे आणि उपमहापौर मा. परशुराम वाडेकर यांच्या शुभहस्ते हा धार्मिक व मंगलमय सोहळा संपन्न झाला. यावेळी प्रभाग क्रमांक ३३ तर्फे लोकप्रिय नगरसेवक सुभाष नाणेकर यांनी सर्व ग्रामस्थांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. धरणातून सुरू झालेल्या पाण्याच्या विसर्गाच्या पार्श्वभूमीवर जलपूजन करून जनतेच्या सुरक्षिततेसाठी तसेच परिसराच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करण्यात आली.

या कार्यक्रमास प्रभाग समिती अध्यक्ष मा. सचिन मोरे, मंडल अध्यक्ष विजयभाऊ मते, गटनेते काकासाहेब चव्हाण, माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप, नगरसेवक मा. राजाभाऊ लायगुडे, मा. भारतभूषण बराटे, नगरसेविका सौ. धनश्री कोल्हे, मनीषाताई मोरे (महिला अध्यक्ष), नगरसेविका सौ. अनिता इंगळे, जयश्री भूमकर, सौ. कोमल सारंग नवले, मा. भगवानराव मोरे, उमेश सरपाटील, सुभाष शिंदे, निखिलद धावडे, विकासजी भोसले, सचिन कांबळे, अनिल मते, गणेशजी गवंडे, सायलीताई भोसले, प्रकाश आगाशे यांच्यासह पाटबंधारे विभागाचे अधिकारी, पुणे महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाचे मुख्याधिकारी व कर्मचारी, विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर उपस्थित मान्यवरांनी नागरिकांना प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे तसेच धरणातून सुरू असलेल्या पाण्याच्या विसर्गाच्या पार्श्वभूमीवर नदीपात्र आणि धोकादायक ठिकाणी जाणे टाळण्याचे आवाहन केले.

# श्री शिशिर बजाज 'महाराष्ट्र का गौरव' पुरस्काराने सन्मानित

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

नवी दिल्ली येथील हयात रीजेन्सीमध्ये आयोजित भव्य समारंभात नवभारततर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित कॉफी टेबल पुस्तकाचे प्रकाशन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी, वरिष्ठ कॅबिनेट मंत्री, धोरणकर्ते, उद्योग क्षेत्रातील मान्यवर आणि देशभरातील प्रतिष्ठित पाहुण्यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या विशेष आवृत्तीत बजाज समूहाचे चेअरमन एमेरिटस आणि बजाज फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. शिशिर बजाज यांच्यावर आठ पानांचे विशेष लेख प्रकाशित करण्यात आले आहेत. या लेखामध्ये स्वातंत्र्यसैनिक, समाजसेवक, उद्योगक्षेत्रातील अग्रणी आणि महात्मा गांधींचे दत्तक पाचवे पुत्र म्हणून ओळखले जाणारे संस्थापक श्री. जमनालाल बजाज यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेण्यात श्री.



शिशिर बजाज यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाचा आढावा घेण्यात आला आहे. या कार्यक्रमात श्री. शिशिर बजाज यांचा भारतीय उद्योगक्षेत्रातील, विशेषतः साखर आणि इथेनॉल क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल तसेच ग्रामीण विकास आणि सामाजिक परिवर्तनासाठी आयुष्यभर केलेल्या कार्याबद्दल सन्मान करण्यात आला. देशाच्या विकासात, उद्योग उभारणीत आणि समाजसेवेत 100 वर्षांपासून मोलाचे योगदान देणाऱ्या बजाज कुटुंबाला हा सन्मान एका विशेष आणि ऐतिहासिक क्षणी मिळाला आहे. राष्ट्र प्रथम, आत्मनिर्भरता आणि सामाजिक जबाबदारी या मूल्यांवर उभारलेला बजाज समूहाचा वारसा काळानुसार भारताच्या गरजांनुसार सतत विकसित होत गेला आहे.



# कॅलिफोर्निया बदामांसह आपली त्वचा अधिक चांगल्या प्रकारे समजून घ्या

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

8 जुलै रोजी जागतिक त्वचा आरोग्य दिन साजरा केला जात असताना, यावर्षीची संकल्पना "उत्तम ज्ञान, उत्तम त्वचा आरोग्य" ही निरोगी त्वचेसाठी योगदान देणाऱ्या घटकांना समजून घेण्याच्या महत्त्वावर प्रकाश टाकते. त्वचेची काळजी घेण्याच्या पद्धती प्रदूषणासारख्या बाह्य ताणांपासून त्वचेचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक आधार देऊ शकतात, परंतु निरोगी, चमकदार त्वचा राखण्यासाठी आपल्या शरीराला पोषण देण्यासाठी आपण काय निवडतो हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. आवश्यक पोषक घटक प्रदान करणारा संतुलित आहार घेणे, ज्यामध्ये कॅलिफोर्निया बदाम, संपूर्ण धान्ये, वनस्पती आणि प्राणिज प्रथिने यांसारख्या त्वचेसाठी उपयुक्त पदार्थांचा समावेश असेल आणि त्यासोबत सक्रिय जीवनशैलीचा अवलंब केल्यास निरोगी त्वचा आणि एकूणच आरोग्यास मदत होऊ शकते. पोषक घटक तुमच्या त्वचेच्या संरक्षणात्मक आवरणाला, अखंडतेला आणि कार्यक्षमतेला आधार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. कॅलिफोर्निया बदाम हे असेच एक सुपरफूड आहे, जे नैसर्गिकरित्या पोषक घटकांनी समृद्ध आहे आणि त्यामध्ये बी जीवनसत्त्वे, झिंक, तांबे आणि आवश्यक लिनोलिक आम्ल यांसह 24 पोषक घटक असतात, जे एकत्रितपणे पेशींचे संरक्षण करण्यास आणि त्वचेच्या संरचनेला योगदान देण्यास मदत करतात. ते जीवनसत्त्व ई ने देखील समृद्ध आहेत, जे त्वचेच्या पेशींचे ऑक्सिडेटिव्ह नुकसानापासून संरक्षण करण्यास आणि कोरडेपणाशी लढण्यास मदत करते. निरोगी, तेजस्वी त्वचेला आधार देणारी आहार योजना तयार करण्यासाठी प्रथिनेयुक्त पदार्थ आणि पालेभाज्यांसोबत त्यांचा समावेश करा. आपण काय सेवन करतो याबाबत जागरूक असणे म्हणजेच त्वचेची योग्य काळजी घेणे, यावर भाष्य करताना, मॅक्स हेल्थकेअर - नवी दिल्लीच्या डायटेटिक्स विभागाच्या प्रादेशिक प्रमुख रितिका समद्दार म्हणाल्या, "तुम्ही तुमच्या शरीरात काय घेता, त्याचे प्रतिबिंब अनेकदा तुमच्या त्वचेवर दिसून येते. म्हणूनच मी माझ्या क्लायंट्सना अशा जीवनशैलीच्या सवयींवर लक्ष केंद्रित करण्यास प्रोत्साहित करते, ज्या आतून निरोगी त्वचेला आधार देतात. संतुलित आहार, पुरेशी झोप, नियमित शारीरिक हालचाल आणि योग्य प्रमाणात पाण्याचे सेवन हे तुमच्या त्वचेचे आणि शरीराचे पोषण करण्यासाठी महत्त्वाचे आहेत. माझ्या क्लायंट्सना त्यांच्या आहारात समाविष्ट करण्याची मी शिफारस करत असलेल्या काही पदार्थांमध्ये ताजी फळे, कमी चरबीयुक्त मांस आणि कॅलिफोर्निया बदामांसारख्या निरोगी चरबीच्या स्रोतांचा समावेश आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.